ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ७ • गुरुवार दि.२४ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## दुष्काळावर विशेष अधिवेशन बोलवा-उद्धव ठाकरे

### ३१ हजार कोटींच्या पॅकेजच्या हिशेब देण्याची मागणी




मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी गंभीर संकटात सापडला असताना सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात आणि दुष्काळाच्या प्रश्नावर विशेष अधिवेशन बोलवावे, अशी मागणी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. गेल्यावर्षी सरकारने जाहीर केलेल्या ३१ हजार कोटी रुपयांच्या पॅकेजमधून प्रत्यक्ष किती शेतकऱ्यांना मदत मिळाली, याची माहिती महाराष्ट्राला मिळायला हवी, अशी मागणी त्यांनी केली.

गेल्यावर्षी अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतजमिनींसाठी हेक्टरी साडेतीन लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली होती. मात्र, या मदतीचा प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांना मिळाला, याची आकडेवारी सरकारने जाहीर करावी, असे ठाकरे म्हणाले. त्याचप्रमाणे सध्या जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीचा लाभ किती शेतकऱ्यांना मिळाला, त्यांची यादीही सरकारने प्रसिद्ध करावी, अशी मागणी त्यांनी केली. हवामान खाते तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांनी मोसमाच्या सुरुवातीलाच पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली होती. ही शक्यता लक्षात घेऊन सरकारने दुष्काळ निवारणासाठी आधीपासून कोणत्या उपाययोजना केल्या, असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला. पावसाअभावी अनेक भागांत शेतकऱ्यांना दुबार-तिबार पेरणी करावी लागत असून खरीप हंगाम मोठ्या प्रमाणात हातातून गेला आहे, असे त्यांनी सांगितले. पिके करपून गेल्यानंतर आता पाऊस पडला तरी झालेल्या नुकसानीची भरपाई होणार नाही. शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा भार वाढला आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला असून पिण्याचे पाणी, धरणे व विहिरी भरणे आणि आगामी रब्बी हंगामासाठी आवश्यक पाऊस यांची चिंता निर्माण झाली आहे, असे ठाकरे म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी ५ ऑक्टोबरनंतर पंचनामे सुरू होतील, असे सांगितल्याचा संदर्भ देत ठाकरे यांनी, शेतकरी संकटात असताना पंचनाम्यांसाठी ५ ऑक्टोबरपर्यंत का थांबता? असा सवाल केला. शेतकऱ्यांचे पीक जळून खाक झालेले असताना प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कर्जमाफी हा त्यांचा शब्द आहे, मुक्ती हा माझा शब्द आहे. शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष किती रक्कम पोहोचली, हे सरकारने सांगावे, अशी मागणी त्यांनी केली. सरकारच्या दुष्काळी पाहणी दौऱ्यांवरही ठाकरे यांनी टीका केली. काही दौरे अवघ्या दहा-दहा मिनिटांत आटोपले जात असल्याचा दावा करत हे दौरे नेमके कशासाठी केले जात आहेत, असा सवाल त्यांनी केला.

गणपती बाप्पा मोरया!पुढच्या वर्षी लवकर या!!

## उद्या बाराव्या दिवशी लाडक्या गणरायाला भक्त देणार निरोप

नांदेड/प्रतिनिधी-लाडक्या गणपती बाप्पाला अनंत चतुदर्शीच्या शुभमुहूर्तावर शुक्रवार दि.२५ सप्टेंबर रोजी निरोप दिला जाणार आहे. श्री गणेश विसर्जन मंडळांकडून मिरवणुकीची तयारी सुरु करण्यात आली असून नांदेड शहरात ठिकठिकाणी श्री गणेश मूर्तींचे विसर्जन केले जाणार आहे. श्री गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडूनही कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



यंदा गणपती बाप्पाचा बारा दिवस मुक्काम असल्याने सर्वत्र भक्तीमय वातावरण होते. श्री गणेश मंडळांकडून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. राज्यातील मराठवाड्यासह काही जिल्ह्यात दुष्काळ निर्माण झाला आहे. त्याचे सावट यंदाच्या गणेश उत्सव कार्यक्रमावर दिसून आले. नांदेड शहरात लहान-मोठ्या अशा ४४४ गणेश मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली आहे. नगिनाघाट, नावघाट, सांगवी, पासदगाव व काळेश्वर येथे गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात येणार आहे. शहरात विविध १७ ठिकाणी गणेश मूर्ती संकलन केंद्र निर्माण करण्यात आले. सहा फुट उंचीच्या मूर्तीसाठी पासदगाव, सांगवी आणि नावघाट येथे कृत्रिम तलाव तयार केले आहेत. सहा ते बारा फुट उंचीच्या मूर्तीचे विसर्जन किवळा साठवण तलाव व येळेगाव खदान येथे केले जाणार आहे. श्री गणेश विसर्जनच्या ठिकाणी प्रशासनाकडून व्यवस्था करण्यात आली आहे. विद्युत पथदिवे, ध्वनी प्रक्षेपण व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. विसर्जन घाटावर कोणतीही अनुचित घटना घडू नये पान ४ वर

## २ ऑक्टोबरला देशभरात व्यापाऱ्यांचा 'नो यूपीआय डे'

नवी दिल्ली: केंद्र सरकारने यूपीआय व्यवहारांवर लागू केलेल्या नव्या शुल्काविरोधात देशभरातील व्यापाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. १५ ऑक्टोबर पासून लागू होणाऱ्या नव्या मर्चंट डिस्काउंट रेटच्या निषेधार्थ व्यापारी संघटनांनी थेट राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी, म्हणजेच २ ऑक्टोबर रोजी 'नो यूपीआय डे' पाळण्याचे मोठे आवाहन केले आहे.

'फेडरेशन ऑफ ऑल इंडिया व्यापार मंडळ' आणि 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' यांसारख्या देशातील आघाडीच्या व्यापारी संघटनांनी हा मोठा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, २ ऑक्टोबर रोजी देशभरातील छोटे-मोठे व्यावसायिक, किरकोळ दुकानदार आणि पेट्रोल पंप चालक यूपीआयद्वारे डिजिटल पेमेंट स्वीकारणार नाहीत. त्यामुळे त्या दिवशी ग्राहकांना खरेदीसाठी रोख रक्कम किंवा क्रेडिट, डेबिट कार्डचा वापर करावा लागणार आहे.एमडीआर ही एक प्रकारची प्रोसेसिंग फी असते, जी डिजिटल पेमेंटची सुविधा देणाऱ्या बँका आणि पेमेंट गेटवेद्वारे व्यापाऱ्यांकडून वसूल केली जाते. सरकार आणि एनपीसीआयच्या नव्या निर्णयानुसार, १५ ऑक्टोबर २०२६ पासून २००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या पी२एम यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के एमडीआर शुल्क आकारले जाणार आहे. व्यापारी संघटनांच्या या आंदोलनाला महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र मंगवे यांनीही पूर्ण पाठिंबा दिला आहे. 'ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन', 'ऑल इंडिया ज्वेलर्स अँड गोल्डस्मिथ फेडरेशन' आणि 'रिटेल ट्रेडर्स वेल्फेयर असोसिएशन' यांसारख्या प्रमुख संघटना २ ऑक्टोबरच्या आंदोलनात सक्रिय सहभागी होणार आहेत.

## 'तृणमूल'पक्षनाव-चिन्हाचा वाद लांबवू नका-सुप्रीम कोर्ट

### शिवसेना नामोलेख करत सुप्रीम कोर्टाचे निवडणूक आयोगावर ताशेरे



नवी दिल्ली: तृणमूल काँग्रेसच्या पक्षनाव आणि निवडणूक चिन्हाचा वाद लांबवू नका असे निवडणूक आयोगाला ठणकावून सांगत न्यायालयाने थेट शिवसेनेच्या पक्षनाव-धनुष्यबाण चिन्हाच्या प्रकरणाचा संदर्भ दिला. विलंबामुळे शिवसेना प्रकरणात काय भोगावे लागले, हे आपण पाहिले आहे. आपल्याला हा वाद सोडवावाच लागेल, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी केली. पक्षफुटीनंतर पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हावरून निर्माण होणारे वाद वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. तृणमूल काँग्रेसच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या.जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

तृणमूल काँग्रेसच्या दोन गटांमधील पक्षनाव आणि निवडणूक चिन्हाच्या वादावर निर्णय घेण्यासाठी निवडणूक आयोगाला किती कालावधी लागेल, असा थेट सवाल न्यायालयाने आयोगाच्या वकिलांना केला. आयोगाकडून सूचना घेऊन पुढील सुनावणीत याबाबत स्पष्ट माहिती देण्याचे निर्देशही देण्यात आले.शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादाचा निर्णय प्रदीर्घ काळ प्रलंबित राहिल्यानंतर आता त्याच प्रकरणाचा दाखला तृणमूलच्या सुनावणीत देण्यात आल्याने या टिप्पणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पक्षफुटीनंतर निर्माण झालेल्या वादाचा निर्णय अनिश्चित काळासाठी लांबविता येणार नाही, असा स्पष्ट संदेशच न्यायालयाच्या भूमिकेतून मिळत आहे. तृणमूल काँग्रेसच्या पक्षनाव आणि निवडणूक चिन्हाबाबत निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देत पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी केली. निवडणूक आयोगाकडून अधिसूचना जारी करून पक्षाचे नाव आणि चिन्ह गोठविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. पान ४ वर

## जन्म-मृत्यू दाखला आता कोणत्याही क्षेत्रिय कार्यालयातून मिळणार

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना अधिक सुलभ, गतिमान आणि पारदर्शक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मनपा प्रशासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता नागरिकांना जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र दाखला मिळवण्यासाठी केवळ संबंधित भागातील क्षेत्रिय कार्यालयावर अवलंबून राहावे लागणार नाही. आता महापालिकेच्या सर्व क्षेत्रिय कार्यालय क्र.१ ते ६ तसेच मनपा मुख्यालयातील अविरत विभागातून हे प्रमाणपत्र नागरिकांना प्राप्त करता येणार आहे.

मनपा हद्दीतील कोणत्याही खाजगी अथवा शासकीय दवाखान्यात, रुग्णालयात किंवा रुग्णालयाबाहेर जन्म अथवा मृत्यू झाला असल्यास, त्याची रीतसर नोंदणी झाल्यानंतर अधिकृत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी नागरिक पालिकेच्या सर्व ६ क्षेत्रिय कार्यालयांपैकी कोणत्याही ठिकाणी किँवा मुख्य कार्यालयात जाऊ शकतात. नागरिक शहरातील कोणत्याही भागात राहत असले तरी आपल्या नजीकच्या पालिका कार्यालयातून या सेवेचा लाभ घेऊ शकणार आहेत. प्रशासनाने नागरिकांच्या सोयीसाठी विकेंद्रीकरण केले असले तरी तांत्रिक कारणांमुळे काही सेवा केवळ मुख्य कार्यालयातच मर्यादित राहतील. सन २०१७ पूर्वीचे जुने जन्म-मृत्यू प्रमाणपत्र काढायचे असल्यास, पूर्वी काढलेल्या प्रमाणपत्रांमध्ये क्यूआर कोड असलेले प्रमाणपत्र प्राप्त करावयाचे असल्यास किंवा यापूर्वीच्या जन्म-मृत्यू प्रमाणपत्राची दुसरी प्रत मिळवायची असल्यास, ही सर्व कामे केवळ महानगरपालिका मुख्यालयातील अविरत विभागातूनच केली जाणार आहेत. केंद्र शासनाच्या सीआरएस प्रणालीमध्ये एकच युजर आयडी ठेवण्यात आला असल्यामुळे, क्षेत्रिय कार्यालय स्तरावर क्यूआर कोड प्रमाणपत्र निर्गमित होणार नाही, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. महानगरपालिका प्रशासनाने तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना उपलब्ध करून दिलेल्या या सुधारित आणि सुलभ सुविधांचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.

## दुष्काळाचा जीआर उद्या;शेतकऱ्यांना थेट मदतीच्या घोषणेची शक्यता

अमरावती:राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेण्यात आला असून, शुक्रवारी दुष्काळासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) काढण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिली.



राज्यातील विविध भागांत सोयाबीन, कापूस, उडीद, तूर यांसह खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दुष्काळाच्या निकषांनुसार ट्रिगर-१च्या आधारे दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया करण्यात येणार असून, निकषांनुसार एखादा भाग वगळला गेल्यास ट्रिगर-३ च्या माध्यमातून त्याचा समावेश करण्याची कार्यवाही केली जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. अमरावती आणि वाशिम जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस गुरुवारी दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पीक परिस्थितीचा आढावा घेतला. राज्यात अनेक भागांत पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांवर गंभीर परिणाम झाला आहे. विशेषतः सोयाबीन, कापूस, तूर आणि उडीद पिकांची स्थिती चिंताजनक असल्याचे त्यांनी सांगितले.दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शेतकऱ्यांना विविध प्रकारची मदत देण्याचे नियोजन सरकारने केले आहे. पिकांच्या नुकसानीपोटी हेक्टरी थेट आर्थिक मदत देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्याचबरोबर दुष्काळग्रस्त भागात चारा आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून देण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. जनावरांसाठी पान ४ वर

## अनुसूचित जमाती विकास श्वेतपत्रिकेच्या मागणीसाठी आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र अनुसूचित जमाती विकासाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याच्या मागणीसाठी आज (गुरूवार) दि. २४ सप्टेंबर रोजी महात्मा फुले पुतळा आयटीआय ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे रॅली काढण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततामय बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या विकासासाठी शासनाने केलेली आर्थिक तरतूद, प्रत्यक्ष खर्च, योजना, लाभार्थी व प्रत्यक्ष लाभ याची अधिकृत माहिती जनतेसमोर यावी. तसेच शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृह, आश्रमशाळा, रोजगार, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रक्रिया आणि न्यायालयीन निकाल याबाबत पारदर्शक अधिकृत माहिती उपलब्ध व्हावी. जनगणनेपासून प्रत्यक्ष लाभापर्यंतची अधिकृत आकडेवारी जनतेसमोर आणावी. अनुसूचित जमातींसाठीची तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती जाहीर करावी आदी मागण्यांसाठी हे आंदोलन




करण्यात आले.या रॅली व धरणे आंदोलनात आदिवासी कोळी महादेव समाज मराठवाडा विभागाचे अध्यक्ष नागनाथराव घिसेवाड, व्यंकट मुदिराज, शशिकांत भुसेवाड, ॲड. परमेश्वर गोणारे, केरबा जेठेवाड, गिरीधर मोळके, केशव कुकलवाड, के.पी. सोने, सिद्धेश्वर पिटलेवाडी, केशव जिंकलवाड, रमेश जेठेवाड, आनंदा रेजितवाड, मारोती मामीलवाड, प्रा. भगवान गुंजलवाड, पुंडलिक मोरे, गंगाधर कल्याणकर, डी.एम. भामटे, लक्ष्मी धोरपडे, अर्चना गुंजावळे, ॲड. चंद्रकला जेठेवाड, मुक्ताबाई मनाठकर यांच्यासह नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी, युवक, महिला, कर्मचारी, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गाडीपुरा येथील क्लबवर पोलीसांची धाड;नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-गाडीपुरा भागात अनेक दिवसांपासून सुरु असलेल्या पत्याच्या क्लबवर बुधवारी इतवारा पोलीसांनी धाड टाकली. या प्रकरणी नऊ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गाडीपुरा भागात हनीसिंग चौधरी यांच्या घरात अनेक दिवसांपासून पत्याचा क्लब सुरु असल्याची गोपनीय माहिती पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांना मिळाली. त्यांच्या आदेशावरुन इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर कैलासे यांच्या नेतृत्वाखाली पोलीसाच्या एका पथकाने बुधवारी धाड टाकली. पैसे लावून जुगार खेळत असतांना भीमराव काशीराम धमने (वय ५६), माधव हौसाजी आरसुलवाड (वय ५४) रा.पाताळगंगा, करीमखान विजुला खान (वय ५२) रा.चौफाळा, मो.सुभान मो.खाजा (वय ५५) रा.खुदबेनगर, राजु पद्माकर भोसले (वय ४१) रा.कोरका पिंपळगाव, विक्की उर्फ विकेश पृथ्वीराज सोनकांबळे (वय ४२) रा.इतवारा, स.अलीओद्दीन स. रहिमोद्दीन (वय ५०) रा.गाडीपुरा, मो.सिराज मो.सलाउद्दीन (वय ४९) रा.देगलूर नाका,नांदेड या आठ जणांना रंगेहाथ पकडले. क्लब चालक हनीसिंग चौधरी हा फरार झाला आहे. पोलीसांनी घटनास्थळावरुन २३ हजार रुपये रोख, ५ मोबाईल जप्त केले. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेची कसोटी

भारतीय लोकशाहीच्या प्रवासात निवडणूक आयोग ही केवळ निवडणुका घेणारी संस्था नाही, तर लोकशाहीच्या विश्वासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका घेणे, मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण करणे आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर जनतेचा विश्वास कायम ठेवणे ही आयोगाची घटनात्मक जबाबदारी आहे. मात्र या संस्थेचे खरे सामर्थ्य आणि तिची घटनात्मक भूमिका सर्वसामान्य भारतीयांच्या लक्षात ठळकपणे आली ती माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषण यांच्या कार्यकाळात.शेषण यांनी निवडणूक आचार संहितेची कठोर अंमलबजावणी केली. निवडणुकीतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी त्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे राजकीय पक्षांनाही आयोगाच्या अधिकारांची जाणीव झाली आणि सामान्य मतदारालाही निवडणूक आयोग म्हणजे केवळ मतदानाची तारीख जाहीर करणारी यंत्रणा नसून लोकशाहीच्या निवडणूक प्रक्रियेचा पहारेकरी आहे, हे समजले. त्यामुळेच आज निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत असतील, तर त्याकडे केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही.गेल्या दोन वर्षांपासून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर विरोधकांकडून सातत्याने टीका होत आहे. विशेषतः मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर वरून हा वाद अधिक तीव्र झाला. मतदारयादी शुद्ध आणि अद्ययावत ठेवणे ही निवडणूक आयोगाची महत्त्वाची जबाबदारी आहे. मृत व्यक्तींची नावे,दुबार नोंदी किंवा अपात्र नावे दूर करण्याबरोबरच पात्र मतदाराचे नाव कोणत्याही परिस्थितीत वगळले जाणार नाही, याची खबरदारी घेणेही तितकेच आवश्यक आहे.एसआयआर प्रक्रियेच्या संदर्भात आता निवडणूक आयोगातील दोन आयुक्तांनी काही मुद्द्यांवर हरकती नोंदवल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे आयोगाच्या अंतर्गत निर्णय प्रक्रियेबाबत नव्याने प्रश्न उपस्थित झाले आहेत. आयोगाने मात्र आयुक्तांनी मांडलेल्या सूचना आणि प्रश्न हे निर्णय प्रक्रियेचा भाग असल्याचे स्पष्ट केले असून अंतिम निर्णय सर्वानुमते झाल्याचे म्हटले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात कोण बरोबर आणि कोण चूक, यापेक्षा नेमकी प्रक्रिया काय झाली, कोणते आक्षेप नोंदवले गेले आणि त्यावर कोणत्या पद्धतीने निर्णय झाला, हे जनतेसमोर स्पष्ट होणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता ही केवळ एक प्रशासकीय गरज नाही; ती लोकशाहीच्या विश्वासाची पूर्वअट आहे. मतदारयादीतील एका चुकीच्या नोंदीचा परिणाम एखाद्या नागरिकाच्या मतदानाच्या अधिकारावर होऊ शकतो. त्यामुळे पुनरीक्षणाच्या प्रक्रियेत नागरिकांना पुरेशी माहिती, हरकत नोंदविण्याची संधी आणि अपीलची सुलभ व्यवस्था मिळणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेससह काही विरोधी पक्षांनी संबंधित राज्यांतील विधानसभा निवडणुका रद्द करून पुन्हा निवडणुका घेण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्रातही शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक रद्द करण्याची मागणी केली आहे. या मागण्या राजकीय आहेत. त्यांची घटनात्मक आणि कायदेशीर वैधता संबंधित प्रक्रियेतच ठरेल. मात्र अशा मागण्यांमुळे जनतेच्या मनात निर्माण होणारे प्रश्न आणि संशय दूर करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर निश्चितच येते.निवडणूक आयोगाने विरोधकांच्या प्रत्येक आरोपाला राजकीय उत्तर देण्याची गरज नाही. त्याऐवजी अधिकाधिक माहिती सार्वजनिक करून, निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकता वाढवून आणि मतदारांच्या शंकांचे निरसन करून आयोग आपली विश्वासार्हता अधिक मजबूत करू शकतो. त्याचवेळी राजकीय पक्षांनीही गंभीर आरोप करताना ठोस पुरावे आणि वस्तुनिष्ठ माहिती जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा विरोधकांचा अधिकार आहे; मात्र त्या प्रश्नांची उत्तरे तथ्यांच्या आधारे शोधणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे. आज खरी कसोटी निवडणूक आयोगाच्या अधिकारांची नाही, तर त्या अधिकारांवरील जनतेच्या विश्वासाची आहे. टी.एन. शेषण यांच्या काळात सामान्य माणसाला निवडणूक आयोगाची ताकद कळली होती. आजच्या काळात त्याच सामान्य माणसाला या संस्थेची निष्पक्षता आणि पारदर्शकता याबाबत कोणतीही शंका राहू नये, हे अधिक महत्त्वाचे आहे.शेवटी निवडणूक जिंकणारा पक्ष आणि पराभूत होणारा पक्ष बदलत राहतात; सरकारे येतात आणि जातात. परंतु निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास टिकला पाहिजे. तो विश्वास अबाधित ठेवणे ही केवळ निवडणूक आयोगाची नव्हे, तर प्रत्येक राजकीय पक्षाची आणि प्रत्येक लोकशाहीवादी नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. भारतीय लोकशाहीची खरी ताकद निकालात नाही, तर तो निकाल निष्पक्ष प्रक्रियेतून आला आहे, यावर जनतेचा असलेला विश्वास यात आहे.

# बळीराजाच्या मदतीसाठी शासन बांधावर; संकटाच्या काळात महाराष्ट्र शेतकऱ्यांच्या पाठीशी!

वर्षा फडके-आंधळे
उपसंचालक (वृत्त)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

शेतकऱ्याच्या शेतात उभे असलेले पीक म्हणजे केवळ शेतीतील उत्पादन नसते; त्यामागे संपूर्ण कुटुंबाची स्वप्ने, मुलांच्या शिक्षणाची आशा, घरखर्चाची तरतूद आणि वर्षभराच्या कष्टाचे फळ दडलेले असते. त्यामुळे पावसाने दडी मारली, जमिनीतील ओलावा कमी झाला आणि डोळ्यांसमोर उभे असलेले पीक करपू लागले की त्याची झळ केवळ शेतापुरती मर्यादित राहत नाही. ती संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर परिणाम करत असते.

महाराष्ट्रातील काही भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांचा दौरा केला. शेतांमध्ये जाऊन त्यांनी पिकांची पाहणी केली, शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ प्रशासकीय अहवाल आणि आकडेवारी पुरेशी नसते. शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे, शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकणे आणि स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे ठरते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यात पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. विशेषतः धाराशिव जिल्ह्यातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी  राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात येतील आणि त्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. संकटाच्या काळात मदतीसाठी निधीची अडचण निर्माण होऊ नये आणि आवश्यक उपाययोजना वेळेत करता याव्यात, यासाठी शासनस्तरावर आवश्यक निर्णय घेतले जातील, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कष्टाचे अंतिम फलित पीक असते. तेच पीक संकटात सापडले तर त्याचा थेट परिणाम त्याच्या उत्पन्नावर होतो. त्यामुळे पीक नुकसानीबाबत शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्यात येईल, अशी महत्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा आधार मिळावा, यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत पिकांइतकाच महत्त्वाचा प्रश्न आहे तो पिण्याच्या पाण्याचा. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या दौऱ्यादरम्यान स्पष्ट केले. त्याचबरोबर जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्यासोबतच शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था केली जाणार आहे. दुष्काळाची झळ केवळ शेतीला बसत नाही, तर त्याचा परिणाम कुटुंबाच्या रोजच्या गरजांवरही होतो. त्यामुळे पाणी, चारा आणि अन्नधान्य या मूलभूत गरजांचा एकत्रित विचार करून उपाययोजना करणे आवश्यक आहे. मदत जाहीर झाल्यानंतर ती प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे असते. या दृष्टीने शेतकऱ्यांना थेट मदत त्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल आणि शासन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

संकटाच्या काळात आर्थिक मदत थेट शेतकऱ्यापर्यंत पोहोचल्याने त्याला तातडीच्या गरजा भागविण्यासाठी आधार मिळू शकतो. राज्यातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळसदृश परिस्थितीशी संबंधित उपाययोजनांची प्रक्रिया



सुरू आहे. बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी, पंचनामे आणि मदतीसाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही यांचा आढावा घेतला जात आहे. दुष्काळ निवारणासाठी मंत्रिमंडळ उपसमितीही स्थापन करण्यात आली असून परिस्थितीनुसार पुढील निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. केंद्राच्या मदतीची प्रक्रिया सुरू असतानाच राज्यस्तरावरही आवश्यक उपाययोजनांची तयारी ठेवण्यात आली आहे. दुष्काळसदृश परिस्थितीत सर्वात मोठी चिंता पाण्याची असते. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा आणि पाणी, उपलब्ध जलसाठ्यांचे नियोजन तसेच पुढील काळातील गरजा यांचा विचार करावा लागतो. पावसाच्या खंडाचा परिणाम केवळ चालू खरीप हंगामापुरता मर्यादित राहत नाही; त्याचा परिणाम पुढील हंगामाच्या नियोजनावरही होऊ शकतो. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्यांचा योग्य वापर आणि भविष्यातील पाणी-चारा गरजांचे नियोजन करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेताना पीक विमा, आपत्ती निवारणाच्या तरतुदी आणि शासनाच्या विविध योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या मदतीचाही विचार केला जात आहे. बाधित भागातील वस्तुस्थिती, पिकांचे नुकसान आणि स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील मदतीबाबत निर्णय घेतले जात आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना उपलब्ध असलेली मदत वेळेत मिळणे आणि त्यासाठीची प्रशासकीय प्रक्रिया सुलभ राहणे महत्वाचे ठरते. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यालाही विशेष महत्व आहे. करपलेली पिके, कोरडी पडलेली शेतजमीन, पाण्याची चिंता आणि पुढील हंगामाचे नियोजन या सगळ्याचा परिणाम शेतकरी कुटुंबावर होत असतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे म्हणणे प्रत्यक्ष ऐकून घेणे आणि त्यानुसार प्रशासनाला आवश्यक सूचना देणे हा संकट व्यवस्थापनातील महत्वाचा भाग ठरतो. मुख्यमंत्र्यांचा लातूर,धाराशिव आणि सोलापूर दौरा याच दृष्टीने महत्वाचा ठरतो. दरम्यान, राज्यातील इतर भागांतील परिस्थितीचाही शासनस्तरावर आढावा घेतला जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील कलोरी तसेच मोताळा तालुक्यातील खडकी खामखेड,रोहिनखेड व टाकळी येथे व अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील धधम व व्याळा या गावांना भेट देऊन पाहणी केली आणि बळीराजाला धीर दिला.तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत संवेदनशीलता व्यक्त करत बाधित भागांतील परिस्थिती जाणून घेण्यावर भर दिला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीसमोर पावसाच्या अनिश्चिततेचे मोठे आव्हान उभे आहे. अशा वेळी शेतकऱ्याच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद, वेळेवर मदत, पाणी आणि चाऱ्याचे नियोजन तसेच पुढील हंगामासाठी आवश्यक आधारव्यवस्था या बाबी महत्वाच्या ठरतात. राज्य शासन आणि प्रशासनाच्या उपाययोजनांचा केंद्रबिंदू शेतकरी आणि त्याचे कुटुंब राहणे आवश्यक आहे. बळीराजाच्या बांधावर पोहोचून परिस्थिती समजून घेणे म्हणजे केवळ पाहणी नव्हे, तर प्रत्यक्ष वास्तव निर्णयप्रक्रियेपर्यंत पोहोचवण्याची प्रक्रिया आहे. आज शेतकरी ज्या परिस्थितीतून जात आहे, त्याची तीव्रता लक्षात घेऊन मदतीची अंमलबजावणी वेळेत आणि प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाच्या निर्णयांसोबतच प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी आणि स्थानिक पातळीवरील समन्वयही तितकाच महत्त्वाचा आहे.

शेतकऱ्याच्या कष्टाचे आणि नुकसानीचे योग्य मूल्यमापन करून त्याला उपलब्ध असलेल्या मदतीचा लाभ वेळेत मिळणे, हीच या संपूर्ण प्रक्रियेची खरी कसोटी ठरणार आहे. पीक नुकसानीसाठी सरसकट मदत, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य, जनावरांसाठी चारा, शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था तसेच थेट खात्यात जमा होणारी मदत या माध्यमातून संकटाच्या काळात शेतकरी कुटुंबाला आधार देण्याचा हा  प्रयत्न आहे. बळीराजाच्या शेतात पुन्हा हिरवाई यावी, त्याच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळावे आणि पुढील हंगामासाठी त्याचा विश्वास कायम राहावा, यासाठी तातडीच्या उपाययोजनांसोबतच पुढील काळाचे नियोजनही आवश्यक आहे. आजच्या परिस्थितीत शासन, प्रशासन आणि स्थानिक यंत्रणा यांच्यातील समन्वय महत्वपूर्ण ठरणार आहे. बळीराजा संकटात असताना घेतलेले निर्णय आणि तो शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्याचा वेग, या दोन्ही गोष्टी महत्वाच्या असतात.

महाराष्ट्राचा शेतकरी संकटांना न घाबरता पुन्हा उभा राहण्याची ताकद ठेवतो. त्याला गरज आहे ती योग्य वेळी मिळणाऱ्या आधाराची. बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य यावे, त्याच्या शेतात पुन्हा हिरवाई नांदावी, त्याच्या कुटुंबाच्या डोळ्यांत पुन्हा सुखी भविष्याची स्वप्ने दिसावीत आणि त्याच्या कष्टाला योग्य आधार मिळावा, यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. शेतकरी हा महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान करणे, त्याच्या संकटात त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याला पुन्हा उभारी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. आज बळीराजाच्या बांधावर पोहोचलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्याला एकच विश्वास देत आहेत - संकट कितीही मोठे असो, महाराष्ट्राचा शेतकरी एकटा नाही. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

# हिंदी ही संपर्क, संस्कृती आणि आत्मनिर्भरतेची भाषा आहे : डॉ.एकलारे

नांदेड/प्रतिनिधी-हिंदी आत्मनिर्भरतेच्या दिशेने पुढे जाणारी भाषा आहे. आधुनिक काळात हिंदीभाषेच्या प्रगत ज्ञानाच्या आधारे अनेक क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. असे प्रतिपादन मुखेड येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ.चंद्रकांत एकलारे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलतांना केले आहे.

नेताजी सुभाषचंद्र महाविद्यालयात हिंदी पंधरवाडा निमित्त हिंदी विभागाच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्रकुमार कुलकर्णी हे होते. विकसित भारताचा आधार : आत्मनिर्भर हिंदी या विषयावर बोलतांना डॉ.चंद्रकांत एकलारे म्हणाले की, पत्रकारिता, अनुवाद, ब्लॉग लेखन, रील्स तसेच विविध प्रसार माध्यमांमध्ये हिंदी भाषेचा वापर निरंतरपणे वाढत आहे. हिंदी ही जनतेच्या मनातील भाषा आहे. हिंदी भाषेने देशातील विविध भाषिक आणि सांस्कृतिक समुदायांना एकत्र जोडण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असून त्यामुळे हिंदी भाषेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. यावेळी बोलतांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रो.डॉ.इर्शाद खान म्हणाले की, जर आपण सामान्य संभाषणाकडे लक्ष दिले तर आपल्याला असे अनेक शब्द आढळतात की ज्यांचा प्रयोग हिंदी आणि उर्दू या दोन्ही भाषांमध्ये सहजपणे केला जातो. दोन्ही भाषांमध्ये केवळ भाषिक संबंधच नाही, तर दीर्घकाळापासून सामाजिक आणि सांस्कृतिक संपर्कही राहिलेला आहे. हिंदी आणि उर्दूचा संबंध भारतीय साहित्यामध्ये ही मोठ्या प्रमाणावर झाल्याचा दिसून येतो. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रो. डॉ. परविंदरकौर महाजन यांनी केले. हिंदी विभागाच्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकतांना त्या म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व



विकासामध्ये भाषेची महत्वाची भूमिका असते. याच उद्देशाला लक्षात घेऊन हिंदी दिवसाच्या निमित्ताने निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि काव्य वाचन यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करणे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी यांनी हिंदी दिवस कार्यक्रमाच्या आयोजनाचे कौतुक केले. हिंदी भाषे विषयी विद्यार्थ्यांमध्ये प्रेम आणि रुची निर्माण करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर अशा प्रकारचे विविध कार्यक्रम आयोजित केले जावेत. असे प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले. हिंदी पंधरवाड्यानिमित्त हिंदी विभागाच्या वतीने महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. संध्या ठाकुर, प्रा. डॉ. मंगेश अटकोरे, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हिंदी विभागातील विद्यार्थी अंकिता तोमर, वैष्णवी गोकुलवाले, निकिता तोमर, निखिल हैबते, वैशाली गायकवाड, विजय वागतकर, सूरज डाके, श्रावणी डहाळे, खुशी वर्मा, सुखजिंदरकौर जक्केवाले इत्यादींनी योगदान दिले.

# ग्रामीण टेक्निकल महाविद्यालयात नशामुक्त युवा अभियान संपन्न

देगलूर/प्रतिनिधी-युवा कार्यक्रम एवं क्रीडा मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने विकसित भारत उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या नशामुक्त युवा अभियानाचा कार्यक्रम ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, विष्णुपुरी येथे उत्साहात पार पडला. युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच त्यांना सकारात्मक आणि निरोगी जीवनशैलीकडे प्रवृत्त करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष-स्थानी जिल्हा युवा अधिकारी अश्विनी कानकटे होत्या. प्रमुख वक्त्या प्रा. सारिका बकवाड यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. युवकांनी व्यसनांपासून स्वतःला दूर ठेवण्याबरोबरच समाजातील इतर युवकांमध्येही व्यसनमुक्तीची जनजागृती निर्माण करावी, असे आवाहन त्यांनी केले.शिक्षण, क्रीडा आणि समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून युवकांनी आपली ऊर्जा सकारात्मक दिशेने वळवावी. निरोगी शरीर, सकारात्मक विचारसरणी आणि सामाजिक बांधिलकी या बाबी युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाच्या आहेत, असेही प्रा. बकवाड यांनी सांगितले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रा. संदीप वडगावे, प्रा. सोनाली येन्नावार आणि प्रा. अभय वाघमारे यांची उपस्थिती होती.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांना 'नो लीव्ह' !

## विनापरवानगी गैरहजेरीवर निलंबनासह एफआयआरची तंबी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची यंत्रणा अधिक गतिमान व सतर्क ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील क्षेत्रीय प्रमुख विभागांच्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या रजा मंजुरीबाबत कठोर निर्देश जारी केले आहेत.

जिल्ह्यात पाणीसाठा, चाराटंचाई तसेच पिकांचे नुकसान यामुळे शेतकरी बांधवांसमोर आर्थिक व मानसिक संकट निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाच्या विविध आर्थिक सवलतींची प्रभावी अंमलबजावणी, कर्जमाफी, बियाणे व खते वाटप, पीक कर्ज पुनर्गठन तसेच शेतकरी सहाय्याच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहेत.

**मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई**

महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, जलसंधारण, सहकार आणि भूमी अभिलेख (मोजणी) या विभागांतील सर्व जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी दुष्काळ निवारण, पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन आणि शेतकरी सहाय्याच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे. कोणत्याही अधिकाऱ्यास पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

**रजा मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे**

दुष्काळी परिस्थिती संपेपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा, अतितातडीची स्वेच्छिक रजा वगळता, संबंधित जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या पूर्वपरवानगीनेच मंजूर करता येईल. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या रजा मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी कोणतेही असले, तरी सद्यस्थितीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय रजा मंजूर करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

रजेचा अर्ज संबंधित विभागप्रमुखांच्या अभिप्रायासह थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक असून, जिल्हाधिकारी कार्यालयाची लेखी पूर्वपरवानगी मिळाल्याशिवाय कोणत्याही अधिकाऱ्यास रजेवर जाता येणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय रजेवर जाणे, परस्पर रजा वाढवून घेणे अथवा मुख्यालयात अनुपस्थित आढळून येणाऱ्या संबंधित जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यां विरुद्ध तात्काळ दुहेरी कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

प्रशासकीय शिस्तभंगाच्या प्रकरणात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकाऱ्यास तात्काळ निलंबित करून कठोर विभागीय चौकशीची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. तसेच, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत कर्तव्यात कसूर करणे, आदेशाचे उल्लंघन करणे अथवा आपत्ती निवारण कार्यात बाधा आणणे याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध दंडात्मक तसेच फौजदारी गुन्हा (एफआयआर) दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

दुष्काळग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणी संवेदनशीलतेने ऐकून त्यांचा तातडीने निपटारा करावा. कामातील कोणतीही कुचराई, दुर्लक्ष अथवा गैरहजेरी ही आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा भंग मानली जाईल, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील सर्व जिल्हास्तरीय तसेच क्षेत्रीय विभागप्रमुखांनी या आदेशाची गांभीर्याने नोंद घेऊन तात्काळ व काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड राहुल कर्डिले यांनी परिपत्रकाद्वारे निर्देशित केले आहे.

# काँग्रेसचे तहसील कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना एकेरी ५० हजार रुपये अनुदान तात्काळ द्यावे या मागणीसाठी काँग्रेस कमिटीच्यातवीने बुधवारी तहसील कार्यालया-समोर घंटानाद आंदोलन करण्यात आले आहे.

यावर्षी गेल्या दोन महिन्यापासून पाऊसच पडला नसल्याने शेतातील खरीप पिके अक्षरशः करपली आहेत. लागवड खर्चही निघणार नसल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. परंतु याबाबत शासन कोरड्या दुष्काळासंदर्भात कोणतेही ठोस पावले उचलत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. काँग्रेसच्यावतीने तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, जिल्हा सचिव गिरीश कोटावर, जिल्हा उपाध्यक्ष दादाराव पाटील पुयड, गंगाधर डांगे, महेश देशमुख, विश्वनाथ पवार निवघेकर, प्रशांत पाटील मुंगल, युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण, नगरसेवक खदीर खान



साहब, राजेश पवार निवघेकर, शिवानंद देवके, वेदांत शेवटे, चक्रधर खानसोळे, रमेश बोडके, भगवान पवार, विठ्ठल आचारी, किशोर पिलेवाड, साई बोंतले, शरद पवार, गोविंद पवार यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी , शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ई-पिक पाहणीत चुकीच्या पद्धतीने नोंद केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

## जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील सोमठाणा येथे ई-पिक पाहणी प्रक्रियेत चुकीच्या पद्धतीने पीक पाहणीची नोंद करून फोटो अपलोड केल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी संबंधित ई-पिक पाहणी सहाय्यक श्री. विजय गीते यांच्याविरुद्ध नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

ई-पिक पाहणी प्रक्रियेअंतर्गत प्रत्यक्ष शेतातील पिकांची पाहणी करून त्याची छायाचित्रे व आवश्यक माहिती प्रणालीवर अपलोड करणे अपेक्षित आहे. सोमठाणा येथे संबंधित ई-पिक पाहणी सहाय्यकाने पीआयपी (फोटोवरून फोटो काढून) ई-पिक पाहणीसाठी छायाचित्रे अपलोड केल्याचे तपासणीत आढळून आले. या प्रकाराची तपासणी करण्यात आल्यानंतर ई-पिक पाहणीची नोंद चुकीच्या पद्धतीने करून शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचे निदर्शनास आले. या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार तहसीलदार, कँधार यांनी ग्राम महसूल अधिकाऱ्यामार्फत संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही केली आहे. ई-पिक पाहणी प्रक्रियेत अनियमितता अथवा चुकीच्या पद्धतीने नोंदी करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# कै.गं.पो.सब्बनवार हायस्कूलच्या कबड्डी संघाची दमदार कामगिरी

कुंडलवाडी/प्रतिनिधी- कै.गं.पो.सब्बनवार हायस्कूल, कुंडलवाडीच्या १४ वर्षा खालील कबड्डी संघाने तालुकास्तरीय स्पर्धेत दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले असून जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली आहे. या उल्लेखनीय यशामुळे सब्बनवार प्रशालेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत सब्बनवार हायस्कूलच्या संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक व उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. पहिल्या सामन्यात सनशाईन इंग्लिश स्कूल, कार्ला या संघाचा पराभव करून सब्बनवार संघाने विजयी सुरुवात केली. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात श्री छत्रपती हायस्कूल, सगरोळी या संघावर मात करत पुढील फेरीत प्रवेश केला.यानंतर झालेल्या उपांत्य सामन्यात लालबहादूर शास्त्री विद्यालय, कासराळी या संघा विरुद्ध सब्बनवारच्या खेळाडूंनी सांघिक एकजूट, चपळता आणि उत्कृष्ट बचावाचे दर्शन घडवत विजय मिळवला. अंतिम सामन्यात लिटल फ्लॉवर कॉन्व्हेंट संघाविरुद्ध अटीतटीच्या लढतीत शानदार खेळ करत विजय मिळविले.या विजयामुळे कै.गं.पो. सब्बनवार हायस्कूलच्या चौदा वर्षा खालील कबड्डी संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल पालक, शिक्षक, क्रीडाप्रेमी आणि कुंडलवाडी परिसरातून अभिनंदन होत आहे. विजयी संघाचे संस्थेचे सचिव व विद्यमान नगरसेवक डॉ.प्रशांत सब्बनवार, मुख्याध्यापक कल्याण गायकवाड, मुख्याध्यापक नागनाथ चेट्लुरे तसेच शिक्षकांनी अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# देगलूर तालुक्यातील विद्युतीकरणाच्या कामांची चौकशी करावी-विनोद बोरजे

देगलूर/प्रतिनिधी- अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत देगलूर पंचायत समितीमार्फत सन २०२५-२६ मध्ये करण्यात आलेल्या विद्युतीकरणाच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप आरटीआय कार्यकर्ते विनोद विठ्ठलराव बोरजे व सामाजिक कार्यकर्ते राजेश बाबुराव चिखलीकर यांनी केला आहे. या प्रकरणातील सर्व कामांची गावनिहाय चौकशी करून दोषी अधिकारी, अभियंते व संबंधित कंत्राटदारांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी तक्रार द्वारे केली आहे.

तक्रारीनुसार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांना मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध विकासकामे केली जातात. देगलूर तालुक्यात या योजनेंतर्गत करण्यात आलेल्या विद्युतीकरणाच्या कामांबाबत यापूर्वीही तक्रारी व वृत्तपत्रांमधून आक्षेप नोंदविण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. आरटीआय कायद्यांतर्गत प्राप्त कागदपत्रांच्या आधारे या कामांची पाहणी केली असता काही ठिकाणी कामे निकृष्ट दर्जाची असल्याचे, काही ठिकाणी पूर्वीचीच कामे नव्याने केल्याचे दाखविण्यात आल्याचे, मोजणी पुस्तिका व जिओ-टॅगिंगशी संबंधित कागदपत्रांमध्ये अनियमितता असल्याचे तसेच निविदा प्रक्रियेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. कामे प्रत्यक्षात पूर्ण होण्यापूर्वी किंवा नियमबाह्य पद्धतीने कागदपत्रांची पूर्तता करण्यात आल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. याशिवाय वापरण्यात आलेले पोल, वायर व इतर साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याचा दावा करण्यात आला असून, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष तपासणी झाल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होईल, असे तक्रारदारांनी म्हटले आहे. तक्रारीसोबत देगलूर तालुक्यातील कामांची गावनिहाय माहितीही सादर करण्यात आली आहे. यात कामाजीवाडी, झरी, देवापूर, होट्टल, आलूर, कुशावाडी, देगांव, कारेगाव, मेदनकल्लूर, कावळगडा, रामपूर, तुंबरपल्ली, पिंपळगाव, बिजलवाडी, रमतापूर, शिळवणी, गवंडगाव, नरगल, शिवणी, टाकळी (ज), बागवान टाकळी, तडखेल, मरखेल, हावरगाव, चौनपुर, नरंगल, थडीसावरगाव, सुगाव, भुतंनहिप्परगा, माळेगाव, बळेगाव, आलापूर आदी गावांतील विविध वस्त्यांमध्ये विद्युतीकरणाच्या कामांचा उल्लेख या यादीत आहे. तक्रारदारांच्या माहितीनुसार, यादीमध्ये सुमारे ४८ कामे किंवा वस्तीस्तरावरील नोंदींचा समावेश असून, त्यासाठी लाखो रुपयांच्या निधीची तरतूद झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.


## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३५०/२०२६
(CNR No.MHND10-001169-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुशेलाबाई भ्र.भिमराव वंजे | वय-७५ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | रावसाहेब पि.भिमराव वंजे | वय-४५ वर्षे | धंदा-शेती |
| ३ | मंगलबाई भ्र.राजकुमार वंजे<br>गिता रोड भगवानबाबा चौक<br>अंबेजोगाई जि.बीड | वय-४२ वर्षे | धंदा-घरकाम |
| ४ | शिवाजी पि.भिमराव वंजे<br>अर्जदार क्र.१,२ व ४ बहादरपुरा<br>ता.कंधार जि.नांदेड | वय-३९ वर्षे | धंदा-शेती |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती अर्जदार क्र.२ ते ४ चे वडिल नामे भिमराव भ्र.गणपती वंजे हे होते ते दिनांक ०२-०५-२०२६ रोजी बहाद्दरपुरा, ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, भिमराव भ्र.गणपती वंजे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत भिमराव भ्र.गणपती वंजे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत भिमराव भ्र.गणपती वंजे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२७/१०/२०२६

आज रोजी दि.१६/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार



स्थापना दिनांक ०७/०२/१९४९ नोंदणी क्रमांक १९८२५

## हातमाग विणकर सहकारी संस्था मा.देगलूर

ता.देगलूर जि.नांदेड

### ७१ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त संस्थेच्या सभासदासाठी)

दिनांक १०/०९/२०२६

सौ./श्री ......................
मु.पो...................... ता.देगलूर जि.नांदेड

सन्माननिय सर्व सभासद हातमाग विणकर सहकारी संस्था म.देगलूर ता.देगलूर जि.नांदेड सुचित करण्यात येते की, संस्थेची ७१ वी वार्षिक सर्व साधारण सभा दि.२६/०९/२०२६ रोज शनिवार सकाळी ठिक ११:०० वाजता संस्थेचे अध्यक्ष श्री व्यंकोबा गोविंदराव टेकाळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्याचे आयोजित केले आहे.

तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेचे स्थळ : संस्थेची इमारत जागेवर,देगलूर ता.देगलूर जि.नांदेड**

**सभेचे विषय :-**

१) मागील सर्व साधारण सभेचे वृतांत वाचुन कायम करणे.
२) संस्थेचे सन २०२५-२६ सालाचे आर्थिक पत्रकास मान्यता.
३) सन २०२६-२७ सालासाठी लेखा परिक्षकांची निवड करणे.
४) संस्थेच्या हिता विरुद्ध गैरवर्तन करणाऱ्या सभासदा विरुध्द कार्यवाही करणे बाबत.
५) आयत्या वेळेचे विषय अध्यक्षाचे संमतीने चर्चेत घेण्यात येईल.

**सुचना :-**

१) सदरहू सभा कोरम अभावी तहकुब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर सभा घेण्यात येईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

स्वाक्षरित/-
**अध्यक्ष**
हातमाग विणकर सहकारी संस्था म.देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड



CHANGE IN NAME

My (old name) is **ANSARI ABDULRUB ABDULHAI** which now I am, changing as (new name) **ABDUL RAB ABDUL HAI ANSARI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**ABDUL RAB ABDUL HAI ANSARI**
C/o ABDUL HAI G.No.221, P.No.08
NOMANIYA NAGAR TARODA KHURD
TARODA BK,NANDED-431605
Mob. No.-9922141999



## जाहीर प्रगटन

कंधार येथील जिल्हा न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री.एम.एम.पाटील, जिल्हा न्यायाधीश-१,कंधार)
मोटार अपघात दावा अर्ज क्र.१७/२०१९
बाबाराव वि.बालाजी व इतर

प्रति,
१.बालाजी संभाजी डांगे वय-मेजर वर्षे, कामधंदा-व्यवसाय
रा.पोखरभोसी ता.कंधार जि.नांदेड

ज्याअर्थी बाबाराव उर्फ बबन पि.श्यामराव घोरबांड वय ५० वर्षे रा.कलंबर खु.ता.लोहा, जि.नांदेड यांनी मोटार अपघात दावा अर्ज क्र.१७/२०१९ बाबाराव वि.बालाजी व इतर हा अपघात मध्ये झालेल्या नुकसानी बाबत मावेजा मिळण्यासाठी सदरील अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त खटल्यात आपली उपस्थितीसाठी समन्स काढण्यात आले होते. परंतु ते वारंवार न बजावता परत येत आहेत.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

करीता दिनांक २३.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आपण जातीने किंवा वकिला मार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याद्वारे आपणास नोटिस देण्यात येते की आपण दिनांक २३.१०.२०२६ रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अपघात मध्ये झालेल्या नुकसानी बाबत मावेजा मिळण्यासाठीचे प्रकरण एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**वरीष्ठ लिपीक**
जिल्हा न्यायालय,कंधार

स्वाक्षरित/-
**(अधिक्षक)**
जिल्हा न्यायालय,कंधार



CHANGE IN NAME

My (old name) is **MOHAMMED NUSRATH ALIAS MOHAMMED NUSRATH MOHSIN** which now I am, changing as (new name) **MOHAMED NUSRATH MOHAMED JEELANI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMED NUSRATH MOHAMED JEELANI**
R/o 5-1-319, Fateh buruj, near old water tank,
Itwara Nanded-431604
M. No.-9172008841



CHANGE IN NAME

My Old Name : **PATHAN IMRAN KHAN**
Father Old Name
**PATHAN ABDUL KARIM**
Mother Old Name
**RAZIA BEE**
Old Address
Mohalla Fakir Pura Near Badi Dargah Post-Tal-Kandhar Dist- Nanded MS



CHANGE IN NAME

New Changes
which now i am changing
My Name
**IMRAN KHAN**
Father Name
**ABDUL KARIM PATHAN**
Mother Name
**Rajiya Begum**
Address
67-1 Dargah Pura Kandhar Near Badi Dargah
Kandhar, Nanded, Maharashtra - 431724

Hence Forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same

Sign by
**Imran Khan S/O Abdul Karim Pathan**
Mobile 8888466347
Email : khan.mrn1@gmail.com

# गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर हदगाव येथे वाहतुकीत बदल

नांदेड/प्रतिनिधी-हदगाव येथे दि. २५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या श्री गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच नागरिकांची सुरक्षितता आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हदगाव परिसरातील वाहतुकीत तात्पुरता बदल करण्यात आला आहे.

जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम ११५ अन्वये प्रदान अधिकारांचा वापर करून दि.२५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेपासून दि.२६ सप्टेंबर रोजी रात्री २ वाजेपर्यंत संबंधित वाहतूक बदलास मान्यता दिली आहे. हदगाव येथील गणेश विसर्जन मिरवणुकीचा मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ वरून जात असल्याने मिरवणुकी दरम्यान वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गोजेगाव ते मल्लीनाथ हॉटेल, उमरखेडहून हदगावकडे येणारा रस्ता एकतर्फी करण्यात येणार आहे. तसेच उमरखेडहून हदगावकडे येणारी वाहतूक दुतर्फा करण्यात येणार आहे. वाहतूक बदलाच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक, नांदेड यांना देण्यात आल्या आहेत.

# लखमाई गॅस एजन्सीच्या कारभाराविरोधात तक्रार; कनेक्शन स्थानिक एजन्सीकडे वर्ग करण्याची मागणी

मांडवी/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील मांडवी परिसरातील यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी येथील लखमाई गॅस एजन्सीच्या ग्राहकांना वेळेवर गॅस सिलिंडर व अपेक्षित सेवा मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. गॅस सिलिंडरसाठी ग्राहकांना वारंवार प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत शेतकरी नेते त्रिभुवनसिंह ठाकूर यांनी किनवटच्या तहसीलदार शारदा चौडेकर यांच्याकडे तक्रार दाखल करून प्रशासनाचे लक्ष वेधले.

तक्रारीची दखल घेत तहसीलदार शारदा चौडेकर यांनी घाटंजी तहसीलदारांना तातडीने पत्र पाठविले आहे. मांडवी परिसरातील लखमाई गॅस एजन्सीच्या सर्व ग्राहकांचे गॅस कनेक्शन किनवट तालुक्यातील स्थानिक गॅस एजन्सीकडे वर्ग करण्यात यावेत, अशी मागणी प्राप्त झाल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या मागणीच्या अनुषंगाने घाटंजी तहसीलदारांनी योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंतीही पत्राद्वारे करण्यात आली आहे.मांडवी परिसरातील ग्राहकांची संख्या मोठी असून, संबंधित एजन्सी घाटंजी येथे असल्यामुळे गॅस सिलिंडर मिळविताना ग्राहकांना अंतराचा तसेच वेळेचा त्रास सहन करावा लागत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. गॅस बुकिंग केल्यानंतर सिलिंडरच्या वितरणासाठी ग्राहकांना सतत प्रतीक्षा करावी लागत असल्याने विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे.या पार्श्वभूमीवर मांडवी परिसरातील गॅस ग्राहकांना स्थानिक पातळीवरच सेवा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांचे कनेक्शन किनवट तालुक्यातील गॅस एजन्सीकडे वर्ग करण्याची मागणी करण्यात आली आहे. तहसीलदार चौडेकर यांनी या प्रकरणी पुढाकार घेतल्याने ग्राहकांच्या अडचणी दूर होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.आता घाटंजी तहसील प्रशासन या तक्रारीवर कोणती कार्यवाही करते, तसेच मांडवी परिसरातील ग्राहकांची गॅस कनेक्शन स्थानिक एजन्सीकडे वर्ग करण्याबाबत कोणता निर्णय घेतला जातो, याकडे मांडवीसह परिसरातील गॅसधारकांचे लक्ष लागले आहे.

# जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड;सहा जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-शिव रोडवरील संकेतनगर पाटी जवळ सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर बुधवारी पहाटे भाग्यनगर पोलीसांनी धाड टाकुन जुगार खेळणाऱ्या सहा जणांना अटक केली.

शहरातील शिव रोड भागात असलेल्या संकेत पाटीजवळ जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती भाग्यनगर पोलीसांना मिळाली. पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार विनोद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने बुधवारी पहाटे सदरील जुगार अड्ड्यावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना दीपक सुभाष येवतीकर (वय ३०) रा.निलेश्वर कॉलनी, नांदेड, विनोद किशनराव खांडरे (वय ३९) रा.स्वास्तिकनगर, शिव रोड,नांदेड, ओमकार बालाजी बैनवाड (वय २७) रा.मंत्रीनगर,नांदेड, सचिन अशोक नागरगोजे (वय ४५) रा.निलेश्वर कॉलनी शिव रोड,नांदेड, शशांक लक्ष्मण गबाळे (वय २४) रा.निलेश्वर कॉलनी,नांदेड, विनायक मधुकर मिरकुटे (वय २६) रा.खंडोबा चौक,नांदेड यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्या जवळून रोख रक्कम, सहा मोबाईल, तीन दुचाकी असा ३ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी सहा जणांविरुध्द भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





शहरातील पटेल कॉलनी मध्ये भगवान श्रीरामाच्या रुपात श्री गणेशजी आणि हनुमानाची मूर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. तर मिलगेट परिसरातील श्री श्रीकृष्ण मंडळाच्यावतीने शेषनागाच्या फन्यावर उभ्या स्वरुपात असलेल्या श्री गणरायाच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली आहे. ही मूर्ती पाहण्यासाठी शहर व परिसरातील गणेश भक्तांची मोठी गर्दी होत आहे.

# पीक कर्जाच्या कागदपत्रांसाठी तहसील कचेरीत गर्दी

## खाते नसलेल्या बँकेची बेबाकी कशासाठी? शेतकऱ्यांचा सवाल

देगलूर/प्रतिनिधी- कर्जमाफी योजनेतील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना नवीन पीक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी विविध शासकीय कार्यालयांचा चकरा माराव्या लागत आहेत. फेरफार नक्कल, टोच नकाशा, तसेच बँकेची व्यवहारी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी देगलूर शहरातील सबंधित कार्यालयामध्ये शेतकऱ्यांची गर्दी होत असून, शेतातील कामे बाजूला ठेवून दिवसभर कार्यालयात थांबण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

देगलूर तालुक्यातील अनेक शेतकरी कर्जमाफी योजनेच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात पात्र ठरले आहेत. या शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळविण्यासाठी विविध कागदपत्रे सादर करावी लागत आहेत. शासनाकडून कर्जमाफीची रक्कम पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले जात असताना, कागदपत्रांची पूर्तता करताना शेतकऱ्यांची मोठी धावपळ होत आहे. विशेष म्हणजे, ज्या बँकेत शेतकऱ्यांचे खाते अथवा कर्ज व्यवहार नाही, त्या बँकेची ही विभाग कि प्रमाणपत्र मागितले जात असल्याचे शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे संबंधित बँकेत जाऊन प्रमाणपत्र घेण्यासाठी अतिरिक्त वेळ व खर्च करावा लागत आहे. यामुळे आधीच शेतीच्या कामात व्यस्त असलेल्या शेतकऱ्यांना नाहक आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे ते सांगत आहेत. फेरफार नक्कल, टोच नकाशा, बेबाकी प्रमाणपत्र, शपथपत्र यासह इतर कागदपत्रे मिळविण्यासाठी एका शेतकऱ्याला सोमवारी दोन हजारापर्यंत खर्च येत असल्याचा दावा शेतकऱ्याकडून केला जात आहे. त्यामुळे शासनाने कर्जमाफी व पीक कर्ज प्रक्रिया अनावश्यक्य कागदपत्रांची संख्या कमी करून, उपलब्ध शासकीय नोंदीच्या आधारे प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे.

# बोधडी बु.रेल्वे पुलाखालील रस्ता दुरुस्त करण्याची मागणी

किनवट/प्रतिनिधी- बोधडी बु. येथील रेल्वे पूल परिसरातील रस्त्याची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, ठिकठिकाणी जीवघेणे पडलेले मोठमोठे खड्डे आणि खड्यात साचलेल्या चिखल-पाण्यामुळे प्रवाशांना प्रचंड हाल सोसावे लागत आहेत. याच ठिकाणी वाटमारीचे प्रकार घडल्याचे वृत्त आहे. म्हणून या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधून रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी बोधडीतील सामाजिक कार्यकर्ते गजानन नरसिंगराव निलेवाड यांनी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड मंडळाच्या मंडल कार्मिक अधिकारी (स.) के.रसना देवी यांच्याकडे निवेदन दाखल केले आहे.

बोधडी मंडळातील हजारो नागरिकांचा मार्केटशी दैनंदिन प्रवास असलेल्या बोधडी रेल्वे पूल परिसरातील रस्त्याची दुरवस्था झाली आहे. मोठमोठे खड्डे पडले असून कड्यात पाणी साचत असल्याने वाहनधारकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. यामुळे विशेषतः दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांचे अपघात नित्याचेच झाले आहेत. मात्र पोलीस दप्तरी त्याची नोंद होईलच असे नाही. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिकच बिकट बनते. तसेच, दीर्घकाळ पाणी साचून राहत असल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढून आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. या तक्रार अर्जाद्वारे बोधडी बु.येथील रेल्वे पूल परिसरातील रस्त्याची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी, रस्त्यावरील खड्डे बुजवून पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पक्की ड्रेनेज व्यवस्था उभारावी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात



यावी, अशा प्रमुख मागण्या निलेवाड यांनी रेल्वे प्रशासनाकडे पाठवलेल्या निवेदनात नमूद केल्या असून केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, हिंगोलीचे खा.नागेश पाटील आष्टीकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, आ. भीमराव केराम यांना पुढील आवश्यक कारवाईसाठी निवेदन पाठवले आहे.

# अल्पवयीन मुलांना मारहाण;अकरा पोलिसांवर गुन्हा

पुणे:आंबेगाव पठार पोलीस चौकीत आठ अल्पवयीन मुलांना बेकायदेशीररीत्या ताब्यात ठेवून मारहाण केल्याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यातील ११ पोलीस अधिकारी व अंमलदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या फॅक्ट फाईंडिंग अहवालानंतर ही कारवाई करण्यात आली असून, प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सोपविण्यात आला आहे.

२० व २१ जुलै २०२६ रोजी आंबेगाव पठार पोलीस चौकीत आठ अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यांना नियमानुसार बाल न्याय मंडळासमोर हजर न करता पोलीस ताब्यात ठेवल्याचा आरोप आहे. या काळात मुलांना बेल्टने मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. यातील काही मुलांना कारच्या बोनेटला बांधून सार्वजनिक ठिकाणी नेऊन त्यांची धिंड काढल्याचाही आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणाची महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने स्वतःहून दखल घेत चौकशी केली. आयोगाच्या आदेशानुसार गुन्हे अन्वेषण विभागाचे संकेत सतीश गोसावी यांच्या तक्रारीवरून भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, सहायक पोलीस निरीक्षक गणेश मोहिते, सहायक पोलीस निरीक्षक स्नेहल थोरात, पोलीस निरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस हवालदार सुनील हनवटे, दिनेश टापके तसेच पोलीस अंमलदार मितेश चोरमोले, सागर बोरसे, सोहम रोडेकर, मंगेश पवार आणि महिला पोलीस अंमलदार स्वप्ना भिसे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह बाल न्याय कायदा २०१५ मधील कलम ७४ व ७५ आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील संबंधित कलमांचा गुन्ह्यात समावेश आहे.


## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३५३/२०२६
(CNR No.MHND10-001190-2026)

अर्जदार -

१ बानो बेगम कासिम पठाण वय-६० वर्षे धंदा-घरकाम
२ सकीनाबेगम कासिम पठाण वय-५४ वर्षे धंदा-घरकाम
३ रहिमखान काशीम पठाण वय-३५ वर्षे धंदा-मजुरी
४ शाहरुख कासिम पठाण वय-३१ वर्षे धंदा-मजुरी
वरील सर्व रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड
५ निशाद सय्यद हरणमारे
रा.समतानगर,उमरी रोड ता.जि.बिड वय-३६ वर्षे धंदा-घरकाम

विरुद्ध
गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ व २ चे पती अर्जदार क्र.३ ते ५ चे वडिल नामे कासिम महेबुब पठाण हे होते ते दिनांक ०८/०८/२०२४ रोजी मौ.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, कासिम महेबुब पठाण यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत कासिम महेबुब पठाण यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत कासिम महेबुब पठाण यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२६/१०/२०२६

आज रोजी दि.१६/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार


पान १ वरुन

## उद्या बाराव्या दिवशी...

म्हणून ६०० जीवरक्षक तैनात करण्यात आले. पोलीस प्रशासनाकडूनही श्री गणेश विसर्जन मिरवणूक काळात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवला जाणार आहे. अतिसंवेदनशील भागात पोलीसांनी विशेष लक्ष केंद्रीत केले असून त्या ठिकाणी पोलीसांची गस्त राहणार आहे. शहरात अनेक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. विसर्जन मिरवणूक काळात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीसांनी उपाययोजना केल्या आहेत. अनेक समाजकंटकांवर पोलीसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.


## उपअधीक्षक भूमि अभिलेख,नांदेड यांचे कार्यालय

जिल्हाधिकारी कार्यालय परिसर बचत भवन जवळ नांदेड ता.जि.नांदेड
दुरध्वनी क्रमांक-(०२४६२) २३४०३९
ई-मेल-dyrlrnanded_nanded@yahoo.in

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मौजे नांदेड ता.नांदेड जि.नांदेड येथील मिळकत ज्याचा न.भु.क्र.१४७०८ असुन या मिळकतीचे धारक कै.विठ्ठलराव पि.कृष्णराव सरदेशपांडे हे दिनांक ०९/१२/२०१८ रोजी मयत झालेले असून त्यांचे वारसदार खालील प्रमाणे असल्याबाबतचे शपथपत्र/अर्ज सादर केले आहे.

| अ.क्र. | नाव | मयताशी नाते |
|---|---|---|
| १ | रघुनाथ पि.विठ्ठलराव सरदेशपांडे | मुलगा |
| २ | दिलीप पि.विठ्ठलराव सरदेशपांडे | मुलगा |
| ३ | विश्वास पि.विठ्ठलराव सरदेशपांडे | मुलगा |

सदरील मिळकत वारसा हक्क कायद्याप्रमाणे वरील वारसदारांच्या नावे सदर मिळकतीचे नामांतरणकामी उप अधीक्षक भूमि अभिलेख नांदेड कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरचे मिळकतीत कोणाचा हक्क अथवा उजर असेल तर त्यांनी पंधरा दिवसाचे आत आपले आक्षेप वरील दर्शविलेल्या कार्यालयात नोंदवावे. सदर प्रकरणी मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरील मिळकत वारसा आधारे अर्जदार यांचे नावे नामांतर करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

उप अधीक्षक भूमि अभिलेख,
नांदेड


# संपूर्ण देशात महाराष्ट्रासारखी महान परंपरा नाही-ह.भ.प.शिवाजी महाराज वटंबे

भोकर/प्रतिनिधी-महाराष्ट्राची परंपरा महान आहे इथे साधू संतांचा जन्म झाला, वारकरी सांप्रदाय आहे, विविध जाती धर्म पंथ असले तरी सामाजिक एकोपा नांदतो, ईश्वर भक्ती, हरिनामाचा गजर होतो, पंढरीची वारी दैदिप्यमान सोहळा आहे. संपूर्ण देशात महाराष्ट्रासारखी परंपरा कुठेच नाही असे आध्यात्मिक विचार राष्ट्रीय कथाकार भागवताचार्य ह.भ.प. शिवाजी महाराज वटंबे यांनी भोकर येथील श्रीमद् भागवत कथा सोहळ्यात बोलताना मांडले.

भोकर येथील श्री सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने १८ ते २५ सप्टेंबर दरम्यान श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून राष्ट्रीय कथा प्रवक्ते भागवताचार्य ह.भ.प. शिवाजी महाराज वटंबे यांच्या रसाळ वाणीतून श्रीमदभागवत कथेला मोठी गर्दी लाभलेली आहे. कथेतील प्रसंग आणि आजची परिस्थिती यावर वटंबे महाराज यांनी जोरदार विश्लेषण केले आहे. ज्यांच्या मनात आस्था आहे, त्यांना भगवंताचा रस्ता मिळतो, दुःख निवारण करण्यासाठी ईश्वर आहे. तुम्ही प्रेमाने मिठी मारा तो सारे निवारण करतो, पंढरीच्या वारीचा महिमा अगाध आहे. लाखो लोकांची भोजन व्यवस्था कोण करतो सर्वांचा सांभाळ रस्त्यावर कोण करते, पायी चालत एवढा प्रवास कसा होतो. संत ज्ञानेश्वर माऊली संत तुकाराम यांच्या महाराष्ट्रात महाराष्ट्रात माणसं वेगळी प्रेमळ आहेत. राजा मोठा आहे विचारही मोठे आहेत. इथे दातृत्वाची भावना आहे देवाला देण्यासाठी परिस्थिती लागत नाही मनस्थिती पाहिजे. कपडे पाहून माणूस ठरत नाही तर त्याचं कर्म चांगलं असावं लागते. पांडुरंगाच्या रंगात रंगून गेले की, जीवनात बेरंग कधी होत नाही भगवंताला जवळ करा प्राण कधी जाईल सांगता येत नाही. देवाची कृपा झाली की जगाची कृपा झाल्याशिवाय राहत नाही असे सांगून कृष्ण जन्म सोहळा, गोवर्धन पूजा अशा विविध देखाव्यांनी कथेमध्ये अधिकच रंग भरला आहे. महिलांची भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली आहे.

पान १ वरुन

## 'तृणमूल'पक्षनाव-चिन्हाचा...

त्यानंतर न्यायालयाने याचिका तातडीने सूचीबद्ध करण्यास सहमती दर्शवली. १८ सप्टेंबर रोजी ममता बॅनर्जी यांनी आयोगाच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. पक्षाची ओळख हिरावून घेणे म्हणजे आईने आपले मूल गमावल्यासारखे दुःख असल्याचे त्यांनी म्हटले होते. दरम्यान, तृणमूल काँग्रेसमधून बाहेर पडून नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडियामध्ये सहभागी झालेल्या २० खासदारांच्या अपात्रतेचा मुद्दाही सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. या खासदारांविरोधात कारवाईची मागणी करणारी याचिका लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा अध्यक्षांना थेट आदेश देण्यासंदर्भातील मर्यादा स्पष्ट केली. मात्र, संविधानाच्या दहाव्या अनुसूचीशी संबंधित अपात्रता प्रकरणांचा लवकर निपटारा होणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

## दुष्काळाचा जीआर...

चाऱ्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठीही आवश्यक उपाययोजना केल्या जातील.दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागात अन्नधान्याची कमतरता भासू नये, यासाठी शासनाकडून आवश्यक मदत केली जाणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणात आर्थिक अडचणींमुळे खंड पडू नये, यासाठीही उपाययोजना करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रज्झाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४